
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा.वा.
दा.क्र. 922९



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401229
BVBK-0401229

# साकार संगीत

# साकार संगीत

संगीत चूडामणि

पं. विनायकबुवा पटवर्धन

कांहीं तरी नवेच करा : ३५

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 9229 दि: 20।5।.
विषय बा. वा. ........
BVBK-0401229



पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.


© : १९५९
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा अँण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति पहिली : १९५९
आवृत्ति दुसरी : १९६४

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.



अप्रबुद्ध, अभ्यासांत कुठेंहि लक्ष नसलें म्हणजे "गवई तरी हो" असें पूर्वीं कुत्सितपणें म्हणत. 'गवई' होण्याला बुद्धीची गरज नसते असा ५०-६० वर्षांपूर्वीं गैरसमज होता. गाणें शिकणें म्हणजे बुद्धि, शक्ति, संयम व महान अभ्यास यांचा विषय आहे; ऐषआरामाचा व रंगेलपणाचा विषय नाहीं. हें सर्व समाजाला पटविण्यासाठीं व जागृतीसाठीं ज्यांनीं आपलें आयुष्य वेचलें; संगीताच्या उद्धारासाठीं व त्याच्या मानासाठीं अपार कष्ट केलें ते थोर पुरुष म्हणजे स्व. गायनाचार्य पंडित विष्णु दिगंबर पलुसकर होत. त्यांच्या रूपानेंच आधुनिक भारतांत संगीत साकार झालें, असें म्हटलें पाहिजे.

# साकार संगीत

पन्नास-साठ वर्षांमागें अखिल भारतांत संगिताच्या सृष्टीला इतकी उतरती कळा लागलेली होती कीं, एखाद्यानें गायन शिकणें म्हणजे समाजांतून तो मनुष्य हीन दर्जाला पोहोंचला असें समजलें जात असे. त्या काळांत म्हणजे सन १८९६ मध्यें, संगिताची ध्वजपताका अखिल भारतांत मानानें डोलत राहिली पाहिजे अशी मनांत ईर्षा ठेवून संगिताच्या बैठका करोत फिरणें हो त्या काळीं केवढो धारिष्टाची गोष्ट ! व ती गोष्ट धारिष्टानें करण्यासाठीं आपण कसें राहिलें पाहिजे, आपण किती अभ्यासू असलें पाहिजे, आपण कसें निर्व्यसनी राहिलें पाहिजे इत्यादि गोष्टींची मनाला तळमळ लागलेली, संगिताला साकार रूप कसें येईल, संगिताला समाजांत मान कसा मिळेल, संगिताला समाजानें आपलेंसें करून घेण्यास काय केलें पाहिजे, कोणत्या रूपानें संगीत हें आबालवृद्धांना, बायकामुलींना अवगत होईल, इत्यादींचो तळमळ लागलेले असे गायक म्हणजे कै. गु. पं. विष्णु दिगंबर पलुसकर हे होत.

### बालविष्णूवरील इष्टापत्ति

पं. पलुसकर हे मूळ राहणारे कुंडलरोडचे (हल्लीचें किर्लोस्करवाडी) स्टेशनजवळ पलुस म्हणून खेडेंगांव

आहे तेथील. तेथें त्यांचे वंशज रहात. यांचें मूळ आडनांव गाडगीळ होतें. यांचे आजोबा व वडील हे कीर्तनकार होते. १८५७ सालच्या बंडांत सामील झाल्याचा आरोप आल्यानें हें गाडगीळ घराणें तेथून निघून कुरुंदवाड संस्थानांत जाऊन राहिलें. 'कीर्तनकार पलुसकरबुवा' या नांवानें ते ओळखले जात. पलुसकर या नांवानेंच ते पुढें सर्वांना माहीत झाले. त्यांनीं गायनाचार्य म्हणून नांव मिळविलें. अखिल भारतांत संगिताचे युगप्रवर्तक म्हणून त्यांनीं मान व लौकिक मिळवला तोहि पलुसकर या नांवानेंच. यांचा जन्म सन १८७२ मध्यें नारळी पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं ८ वा. कुरुंदवाड या गांवीं झाला. कुरुंदवाड हें पटवर्धनांचें लहानसें संस्थान होतें.

बालवयांत दंगा करण्यांत छोटा विष्णु तरबेज होता. शालेय शिक्षण अर्थात् चालू होतें. त्या काळामध्यें संस्थानिकांचा आश्रय ही मोठी मानाची गोष्ट समजली जात असे आणि ती बाल विष्णूला लाभली होती. अशा सुखसमृद्धीच्या काळांत अंगांत रगेलपणा भरपूर असला तर त्यांत नवल नाहीं. एकदां दिवाळींत बरोबरच्या सवंगड्यांसहित दारू उडविणें चाललें होतें. भुसनळा उडेना म्हणून विष्णु घरांत गेला आणि त्यानें चुलींतले निखारे आणून भुसनळ्यावर ठेवले आणि तें फुंकण्याचें काम त्यानें सुरू केलें होतें. अर्थातच निखारे फुंकल्यावर तो भुसनळा पेटला खरा, पण इकडे बालविष्णूचे डोळे भाजले आणि ते कायमचे अधू होऊन बसले. अर्थातच मग चालू शालेय शिक्षण सोडणें त्याला भाग पडलें. विष्णूवर बालपणांत

कोसळलेली ही आपत्ति भयंकर होती हें तर खरेंच, परंतु दुसऱ्या तऱ्हेनें पाहातां ती इष्टापत्ति ठरली ! त्या आपत्तिमुळेंच भारताला विष्णुबुवांच्या रूपानें एक असामान्य गायनाचार्य लाभला.

मिरज, सांगली, कुरुंदवाड, इलचकरंजी, कोल्हापूर या संस्थानांच्या पंचक्रोशींत कृष्णा-पंचगंगेच्या कांठीं त्या वेळीं तरी कलांचें माहेरघर होतें. तत्कालीन गवई, नाटककार, सर्कसवाले, नाटक मंडळ्या साऱ्या या पंचक्रोशींतल्याच होत्या. त्या काळांतले सर्व बाबतींतले कलाकार एकापेक्षां एक नांवलौकिक मिळवून कलेची जोपासना करणारे होते. अनेक गायक, नट, नाटक मंडळ्या, सर्कशी याच काळांत उदयास आल्या. त्यांतलेच स्व. गु. पं. विष्णुबुवा पलुसकर.

## संगिताचें शिक्षण

विष्णुबुवांचें संगिताचें शिक्षण कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांच्या पदरीं असलेले कै. गायनाचार्य बाळकृष्णबुवा इलचकरंजीकर यांच्यापाशीं झालें. मिरजकरांच्या आश्रयानें व कृपेनेंच विष्णुबुवांचें हें शिक्षण पार पडलें. अव्याहत १०-१२ वर्षें ते संगिताचें शिक्षण घेत होते, आणि त्याबरोबरच त्यांचा संगीतशास्त्राचा अभ्यासहि सुरू होता.

विष्णुबुवा प्रथम दररोज दोन तीन तास अभ्यास करीत पण हा अभ्यास कमी पडूं लागल्यानें पुढें ते बारा-बारा तास रोजची बैठक मारून गायनाचा अभ्यास करूं लागले. सायंकाळीं ७ च्या ठोक्याला अभ्यासाला प्रारंभ करावा

तर दुसऱ्या दिवशीं सकाळीं ७ लाच तो संपवावा अशी मेहनत त्या तपस्व्यानें अव्याहत तीन वर्षें केली. पण संगिताच्या या त्यांच्या चालूं नवसाधनेंतहि एक विलक्षण अडचण येऊन उभी राहिली; पण कल्पक विष्णुबुवांनीं ती विलक्षण रीतीनेंच दूर केली.

ज्या जागेंत विष्णुबुवा रात्रभर आपला गायनाचा अभ्यास करीत तें घर घराच्या मालकांनीं विकायला काढलें. घर विकलें गेल्यानंतर आपली अभ्यासाची जागा नाहींशीं होणार अशी विष्णुबुवांची खात्री झाली. त्याबरोबर 'या घरांत भूतबाधा आहे' असें सांगण्यास त्यांनीं प्रारंभ केल्यामुळें तें घर १९१८ पर्यंत विकलें गेलें नाहीं. साहजिक आहे 'भूतानें' पछाडलेलें घर खरेदी करून नसती भूतबाधा विकत घेतो कोण ? पण या युक्तीमुळें विष्णुबुवांचा अभ्यास अव्याहत सुरू राहिला. त्या वेळीं मेहनतीनें जो आवाज कमावला गेला त्या जोरावरच त्यांनीं भारतभर नांव मिळविलें. आवाजांत एक प्रकारची अशी शक्ति त्यांनीं मिळविली कीं त्या शक्तीच्या जोरावरच त्यांचा सर्वत्र प्रभाव पडत असे. या प्रखर अभ्यासानें विष्णुबुवांना पल्लेदार, सुरेल, खणखणीत आणि तितक्याच गोड आवाजाची देणगी मिळवून दिली.

विष्णुबुवांना गंभीर प्रकृतीचे राग फार आवडत असत; आणि त्यांच्या गंभीर व मोठ्या आवाजाला ते राग खुलूनहि दिसत होते. ललत, भैरव, भैरवबहार, आसावरी, तोडी, गान्धारी, मुलतानी, भीमपलासी, मारवा, श्रीराग, भूप, केदार, हमीर, बागेश्री, मालकंस, मालगुंजी, हिंडोल,

बसंत, बसंत बहार इत्यादि राग त्यांचे फार आवडते होते आणि ते परिणामकारक वठत. त्याचप्रमाणें भजनें म्हणण्यासाठीं भैरवी, काफी, सोहनी, मांड, कौशिया इत्यादि रागांचा ते फारच परिणामकारक उपयोग करीत.

ज्या रागांत चिजा फार कमी होत्या त्या रागांत त्यांनीं नवीन बसविल्या. धृपदें, धमारी, तराणे, सारीगम, चतरंग, टप्पे इत्यादि संगितांतले सर्व प्रकार त्यांनीं बसविले. अशुद्ध व बीभत्स चिजा काढून टाकून उत्तम अर्थाच्या नवीन चिजा, भजनें वगैरे तयार केलीं. संगिताचें स्वरूप लोकाभिमुख करून लोकांना आवडेल असें काव्य हुडकून काढून तें चांगलें बसवून लोकांना ऐकवूं लागले. गुजराथी पदें, संस्कृत कविता व श्लोकहि संगितांत बसवून संगीत हें साहित्याशीं संलग्न करून दाखविलें. साहित्याला संगिताची जोड देऊन पूर्वींच्या रंगेल संगितावरील अश्लील चिजांचा पगडा घालवून दिला. नवीन शुद्ध, सात्त्विक व परमेश्वरभक्तीच्या कविता बसवून लोकांच्या समोर मांडण्याची प्रथा प्रथम विष्णुबुवांनीं पाडली.

## मिरजेबाहेर प्रयाण

यथावकाश त्यांचें संगिताचें शिक्षण पुरें झालें. संगिताचें शिक्षण संपलें तरी संगिताचा प्रचार करण्याची मनांतली तळमळ त्यांना गप्प बसूं देत नव्हती. श्रीमंत मिरजकरांकडून बाहेर पडायला परवानगी मिळण्याची शक्यता नाहीं हें उघड दिसत होतें. तशांतच विष्णुबुवांचें आपल्या गुरुवर्यांशींहि थोडें बिनसलें होतें. तरीपण त्यांचा मिरज सोडण्याचा विचार सारखा सुरू होता. पण जवळ पैसा

नाहीं. तेव्हां बाहेर कसें जावयाचें या काळजींत ते असत. अशा वेळीं कै. केशवराव पटवर्धन यानीं २५ रुपये देऊन त्यांचा मार्ग खुला केला. (केशवराव हे या पुस्तकाच्या लेखकाचे सख्खे चुलते आणि विष्णुबुवांचे गुरुबंधुहि होते.) त्या पंचवीस रुपयांच्या पुंजीवर या तपस्व्यानें मिरजेबाहेर पाऊल ठेवलें.

प्रसाराचाच तो श्रीगणेशा होता. मिरजेहून प्रथम मुक्काम त्यांनीं सातारा येथें केला नंतर तेथून ते बडोद्यास जाऊन पोहोंचले. त्या वेळच्या (म्हणजे १८९६ सालीं) कै. श्रीमंत राणीसाहेब जमनाबाईसाहेब गायकवाड यांना गाण्याचा फार शोक होता. त्या विष्णुबुवांचें गाणें ऐकून फार खूष झाल्या. त्यांनीं ग्वाल्हेरपर्यंतची त्यांच्या दौऱ्याची व्यवस्था करून दिली. तेथून पुढें ग्वाल्हेरला गाण्याच्या अनेक बैठकी झाल्या. तेथें मंडळींनीं गाणें ऐकल्यावर, ग्वाल्हेर घराण्याचें अस्सल गाणें ग्वाल्हेरबाहेर महाराष्ट्रांत शिकून कोणी एक गवई आला आहे याचें त्यांना मोठें नवल वाटलें. ग्वाल्हेरचें खरें गाणें म्हणजे हद्दूखां–हसूखांचें; पण तें या नवागत गवयाच्या गळ्यांतून ऐकून कांहीं मुसलमान गायक सुद्धां विष्णुबुवांची तारीफ करूं लागले. ग्वाल्हेरच्या महाराजांनीं भरतपूर, मथुरा येथील व्यवस्था करून त्यांची भरतपूरकडे रवानगी करून दिली. मथुरेहून पुढें ते दिल्लीस गेले. दिल्लींत महिनाभर मुक्काम करून पुढें पंजाब प्रांतांत त्यांचा दौरा सुरू झाला.

विष्णुबुवा आतां विष्णुबुवा राहिले नव्हते; त्यांना लोक पंडितजी म्हणून संबोधूं लागले होते. पंडितजी पुढें सुमारें

वर्षभर पंजाबमध्येंच हिंडत होते. जालंदर, अमृतसर, लाहोर, रावळपिंडी, गुजराणवाला, माँटगूमरी, मुलतान, जम्मू, काश्मीर वगैरे प्रांतांत यशस्वी दौरा करून त्यांनीं अपूर्व यश मिळविलें. पंजाबमध्यें लाहोरला कायमचें वास्तव्य करण्याचा विचार पंडितजींच्या मनांत याच सुमारास चालू होता.

**गिरनार पर्वतावरील आशीर्वाद**

बडोदा सोडल्यावर गुजराथमध्यें दौरा करीत असतांना पंडितजी त्या वेळच्या जुनागड संस्थानांत गेले होते. जुनागडजवळ गिरनार पर्वतावर श्री दत्तात्रेयांचें जागृत स्थान आहे. पंडितजींच्या घराण्यांत दत्तभक्तीचें वरदान होतें, त्यामुळें गिरनारला दत्तदर्शनासाठीं जाण्याचें त्यांनीं ठरविलें. तेथें जाऊन दर्शन घेऊन पंडितजींनीं श्रीदत्त-महाराजांची गायनरूपानें सेवा केली. सेवा झाल्यावर तेथेंच पंडितजींना एका सिद्धपुरुषाचें दर्शन झालें. त्यांनीं आशीर्वादपूर्वक आदेश दिला कीं, "बेटा, परमेश्वर तुझ्या पाठीशीं उभा आहे. त्याची कृपा असल्यावर तुला कसलीहि अडचण येणार नाहीं. तूं पंजाबांत जा. उत्तर दिशेकडून मग दक्षिणेकडे—म्हणजे मुंबईकडे—जा. त्यांत तुला यश लाभेल." त्या सिद्धपुरुषाच्या या आदेशामुळें पंजाबमध्यें लाहोरला राहण्याचा जो विचार पंडितजींच्या मनांत चालू होता, तो त्यांनीं कायम करून टाकला. लाहोरला कायम वास्तव्य करून त्यांनीं प्रथम 'गांधर्व महाविद्यालय' लाहोरला स्थापन केलें, याचें कारण त्या सिद्धपुरुषाचा आशीर्वादच होय. सिद्धपुरुषांचा आशीर्वाद म्हणजे तें

परमेश्वरी कृपेचेंच फळ. त्यानेंच पंडितजींचें संगिताचें कार्य वाढत गेलें.

गांधर्व महाविद्यालयाची स्थापना

सन १८९६ ते १९०१ या काळांत पंडितजींनीं आपल्या लोकविलक्षण प्रभावी गायकीनें श्रोत्यांना मोहून टाकलें होतें. तरीपण पंडितजींच्या मनांतला संगिताला साकार-रूप कसें देतां येईल हा विचार कधींच लोप लावला नव्हता. या विचारांतूनच निर्माण झालेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'गांधर्व महाविद्यालया'ची १९०१ च्या दि. ५ मे या दिवशीं झालेली स्थापना. हें विद्यालय स्थापन करतांना त्यांची भूमिका केवळ कलावंत किंवा कलाकार अशी नव्हती; तर आपण विद्यादानाचें कार्य करीत रहावें हीच मनांतील प्रबळ ईर्षा त्यामागें होती आणि ही गोष्ट त्यांच्या आयुष्यांतील उच्चतम त्यागाचीच निदर्शक होती. नुसत्या गाण्याच्या बैठकी करीत फिरल्यानें कांहीं संगिताचा खरा प्रसार होणार नाहीं तर गाण्यांच्या बैठकीबरोबर ज्ञान-दानाचीहि बैठक मांडली पाहिजे हें त्यांनीं ओळखलें होतें. संगीत ऐकून त्याचें रसग्रहण करण्यासाठीं सुद्धां संगीत ऐकण्याला शास्त्रीय ज्ञानाची फार आवश्यकता आहे याची पंडितजींना जाणीव झाल्यानेंच त्यांनीं गांधर्व महाविद्या-लयाची स्थापना केली. अखंड भारतांतील पूर्वींच्या पंजाब-मध्यें लाहोर येथें ही स्थापना झाली हें विशेष, कारण संगीतशिक्षण घेणें ही फार वाईट गोष्ट आहे, अशी समजूत त्या काळीं दृढमूल झालेली होती. अशा काळांत लाहोर-सारख्या दूरच्या ठिकाणीं संगीत-संस्था उभी करण्यास

काय कष्ट पडले असतील याची कल्पनाच केलेली बरी. आरंभीं तेथें १०–१५ विद्यार्थी शिक्षण घेऊं लागले पण संगीतप्रसाराची जी कल्पना पंडितजींच्या डोक्यांत होती ती एवढ्यानें सफल होण्यासारखी नव्हती. काश्मीरच्या त्या वेळच्या महाराजांची व मिरजेचे राजेसाहेब कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांची त्यांना मदत बरीच होती. तरी पण पंडितजींच्या मनांतील संगीतप्रसाराचें स्वप्न साकार होईना. अखेर एका वेगळ्याच कल्पनेनें त्यांच्या मनांतील आकांक्षेला यश येण्याचें चिन्ह दिसूं लागलें.

**संगिताचा 'उपदेशक' वर्ग**

कांहीं विद्यार्थी जवळ ठेवून घेऊन, त्यांचा खाण्या-पिण्याचा, कपड्यालत्त्याचा सर्व खर्च करून त्यांना संगिताचें शिक्षण दिलें तरच विधायक कार्य होईल, अन्यथा होणार नाहीं, अशी पंडितजींची खात्री अखेर पटली. त्यासाठीं त्यांनीं एक योजना आंखली; आणि त्यांतून एक 'उपदेशक' वर्ग सुरू केला. धर्माचा प्रसार करणारे 'उपदेशक' त्या वेळीं आर्य समाज तयार करीत होता. त्याच कल्पनेवर संगिताचा प्रसार करणारा 'उपदेशक' तयार केला तर संगीतप्रसाराच्या कल्पनेचें कार्य प्रत्यक्ष कांहीं दिसेल असें पंडितजींच्या मनानें घेतलें. लगेच २५–३० विद्यार्थी जवळ ठेवून घेऊन त्यांना सांगिताचें शिक्षण देण्यास त्यांनीं प्रारंभ केला.

जालंदरचें कन्या महाविद्यालय, बनारसचें डॉ. ॲनी बिझांटबाईचें सेंट्रल हिंदु कॉलेज व काश्मीरचे महाराज यांच्याकडे शिक्षक पाठवून संगिताचें शिक्षण देण्याची

विधायक कामगिरी या 'उपदेशक' वर्गाच्या रूपानें सुरू झाली. संगीतशिक्षणाची मूळ मोंगली पद्धत म्हणजे चंगीभंगीपणा पंडितजींनीं नष्ट करून टाकला. त्याऐवजीं खास हिंदुपद्धतीचें म्हणजे 'गुरुकुला'सारखें स्वरूप पंडितजींनी त्याला दिलें. त्यामुळें गुरु-शिक्षक व विद्यार्थी यांचें एक ठिकाणीं रहाणें चोवीस तास होऊं लागलें. याचे परिणाम १९०७-१९०८ पर्यंत थोडेंबहुत दिसूं लागले.

पण लाहोरला रहाणें पंडितजींना जड वाटूं लागलें. म्हणून १९०८ सालीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर मुंबईस त्यांनीं गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. थोड्याच दिवसांत म्हणजे ३–४ वर्षांत मुंबईच्या या विद्यालयामुळें पंडितजींच्या कार्यास चांगलें रूप येऊं लागलें.

मुंबईस महाविद्यालयाचें कार्य इतकें वाढलें कीं, ४०० ते ४५० विद्यार्थी रोज शिक्षण घेऊं लागले. त्यांत स्त्रिया व मुलींचे वर्ग दुपारीं ३ ते ६ असत. १५० ते २०० स्त्रिया-मुली संगिताचें शिक्षण या वर्गांतून त्या काळीं घेत असत हें वाचून आश्चर्य वाटेल. यांना शिकविण्यासाठीं कांहीं शिक्षिकाहि तयार केल्या होत्या. पारशी, गुजराथी, मारवाडी, महाराष्ट्रीय, बोहरी, मुसलमान सर्व जातींच्या महिला मुली-मुले व पुरुष संगिताचे धडे या महाविद्यालयांत येऊन घेऊं लागले. गाणें शिकण्याचा प्रचार इतका झाला कीं, पंडितजींचे २०–२५ शिष्यहि शिक्षक म्हणून अपुरे पडूं लागले. संगीत ऐकावयाचें तर ऐकणारा गाण्यांतला सुशिक्षित पाहिजे हाहि उद्देश महाविद्यालय काढण्यांत होता. कारण तसें पाहिलें तर या ४००-५००

विद्यार्थ्यांमध्यें प्रत्यक्ष गाणारे किंवा वाजवणारे विद्यार्थी-कलाकार किती उत्पन्न होतील याबद्दल शंका होती आणि म्हणूनच कलाकार उत्पन्न करावयाचे तर 'उपदेशक' वर्ग कायम ठेवला पाहिजे, तरच पुढील काळांत नामवंत गायक-वादक निर्माण होतील याची जाणीव पंडितजींना चांगलीच होती. त्यामुळें त्यांनीं अखेरपर्यंत 'उपदेशक वर्ग' चालू ठेवला होता. 'उपदेशक' वर्गांतील विद्यार्थ्यांचा सर्वच खर्च विद्यालयाच्या फीमधून होत असे. अखेर अखेर ८० ते ९० पर्यंत भावी गायकांचें व शिक्षकांचें संगोपन सर्व तऱ्हेनें पंडितजींनींच केलें आणि त्यामुळेंच त्यांचें नांव अजरामर झालें यांत तिळमात्र शंका नाहीं.

## स्वरलेखन पद्धतीचा शोध

पंडितजी हे जसे गायक होते तसे ते शोधकहि होते. १९०१ सालीं त्यांनीं लाहोर येथें गांधर्व महाविद्यालय या नांवानें संगिताचें विद्यापीठ उघडलें. त्यांत शेकडों मुलें शिक्षण घेत होतीं. शिक्षण देतांना लयबद्ध गाणें शिकविण्यास अडचण पडूं लागली. पाश्चिमात्य गाणें कागदावर जसें लिहिलें जातें तसें आपलें गाणें कां लिहिलें जाऊं नये, हा विचार पंडितजींच्या मनांत येऊं लागला. मग इंग्लिश नोटेशनचा अभ्यास करून त्यांतले लयीचे प्रकार लिहिण्यांतील उत्तम गुण त्यांनीं शोधून काढले आणि त्याबरहुकूम त्यांनीं आपली भारतीय संगिताची लेखनपद्धति बसविली, व त्या लेखनपद्धतीनें १९०३ सालीं गुरुमुखानें मिळालेली गायकी पुस्तकरूपानें छापून त्यांनीं प्रसिद्ध केली. भैरव, कल्याण, भूपाली, बिहाग व मालकंस असे पांच राग पाऊण

तासपर्यंत विद्यार्थी गाऊं शकेल अशीं पुस्तकें लिहून संगिताचा एकेक पैलू साकार करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. ही लेखन-पद्धति अत्यंत सुसंबद्ध व संगिताला प्रात्यक्षिकाचें साकार रूप पूर्णत्वानें दर्शविणारी ठरली आहे. तशी दुसरी एकहि पद्धति आतांपर्यंत दुसरा कुणीहि काढूं शकला नाहीं. या लेखनपद्धतीनें गाणारा जसा गाईल तसेंच्या तसें लिहितां येतें. पंडितजींची लेखनपद्धति इंग्लिश लेखनपद्धतीचें अनु-करण आहे अशी कांहीं टीकाकारांनीं टीका केली. तींत चिन्हें फार आहेत, ती वाचण्यास क्लिष्ट आहे इत्यादि आरोपहि तिच्यावर केले, तरी पण मुळाशीं प्रामाणिकपणा राखणें व बिनचूकपणा हे दोन महत्त्वाचे गुण पंडितजींच्याच लेखनपद्धतींत आहेत ही निर्विवाद गोष्ट आहे. पंडितजींनीं सर्व तऱ्हेचीं संगितोपयोगीं पुस्तकें लिहिली; त्यांची संख्या ५०–६० तरी भरेल. त्यांच्या लेखनपद्धतींत चिन्हांचीं नांवें भारतीयच आहेत. चतस्र, गुरु, लघु, द्रुत, अणुद्रुत, अणु-अणुद्रुत इत्यादि.

शिक्षण देतांना प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणा-पर्यंतचीं सर्व पुस्तकें पंडितजींनीं लिहिलीं. त्यांच्या शिष्य-मंडळींनीं त्यांचीच लेखनपद्धति स्वीकारून अखिल भारतांत त्यांच्या लेखनपद्धतीचा प्रसार पुस्तकरूपानें या घटकेपर्यंत जिवंत ठेवला आहे. १९०१ पासून १९५९ पर्यंत ५९ वर्षें या लेखनपद्धतीनेंच अखिल भारतांत संगीतविद्या अमर राखली. 'जसें बोलावें तसें चालावें' या म्हणीप्रमाणें, पंडितजी जसें गात तसें त्यांनीं लिहिलें व तसेंच त्यांच्या विद्यार्थ्यांनीं गावें म्हणून पुस्तकरूपानें एकेका रागाचें

प्रात्यक्षिक त्यांनीं साकार करून ठेवलें. त्यामुळें १९०३ सालांतील त्यांच्या पुस्तकांच्याप्रमाणें आज या घटकेला गाऊन दाखविलें तर ५५ वर्षांपूर्वींची गायकी आज प्रत्यक्षपणें आपल्यासमोर उभी राहूं शकते. हीच त्यांच्या लेखनपद्धतीची आज मोठी किंमत समजली पाहिजे.

**संगीत-परीक्षांची अभिनव कल्पना**

संगीतप्रसाराचें खरें कार्य मुंबईस गांधर्व महाविद्यालय स्थापन झाल्यानंतरच सुरूं झालें. संगीतप्रसाराच्या कार्यास यापुढें मूर्तस्वरूप येऊं लागलें. त्यांतलेंच एक महत्त्वाचें कार्य म्हणजे 'संगिताच्या परीक्षा'. लाहोरपासूनच संगिताच्या परीक्षा घेण्याचें कार्य खरें सुरू होतें; पण मुंबईस आल्यावर पंडितजींनीं सुसूत्र अभ्यासक्रम आंखून तयार केला. कोणत्याहि संगीत-विद्यार्थ्यास तो गाणें शिकण्यास योग्य होण्यासाठीं प्राथमिक गाण्याच्या अभ्यासासाठीं चार वर्षांचा अवधि ठेवला. त्याला 'संगीत प्रवेशिका' असें नांव देऊन पुढील पांच वर्षांत 'संगीत प्रवीण' असा दोन परीक्षा निर्माण केल्या व त्याप्रमाणें परीक्षा घेण्यास प्रारंभ केला. प्राथमिक शाळा, हायस्कूल व कॉलेज यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणेंच या परीक्षांचें स्वरूप ठेवण्यांत आलें होतें. इंग्रजी अभ्यासक्रमांतील पदव्या मिळविण्यास जी मेहनत व बुद्धि लागते, तितकीच मेहनत व बुद्धि संगीतशिक्षणास आवश्यक आहे, हें जनतेला परीक्षेच्या रूपानें पंडितजींनीं पटवून दिलें.

अशा विचारानें पदवीदानाचें कार्य सुरू करतांना १९११ ते १९३१ च्या दरम्यान पांच पदवीदान-समारंभ

झालें. मुंबई प्रांताचे तीन गव्हर्नर–सर सिडनहॅम क्लार्क, लॉर्ड विलिंग्डन व सर जॉर्ज लॉईड यांच्या हस्तें यांतील तीन समारंभ झाले. शिवाय मोठे लोक व गाण्याचे प्रेमी अशांच्या हातूनहि पदवीदान समारंभ पार पाडण्यांत आले. याचा उपयोग संगिताचा दर्जा वाढविण्यांत झाला. संगिताला साकाररूप देण्यांतील पहिली पायरी या परीक्षांच्या रूपानें व पदवीदान-समारंभांनीं उभी केली.

**जलशाचे आद्य प्रवर्तक**

गाण्याचे जलसे करण्याचा प्रघात पन्नास वर्षांपूर्वी फारच कमी होता. पंडितजींनीं प्रथम जलसा जाहीरपणें सुरूं केला. १९०९ सालीं धोबी तलावावरील फरामजी कावसजी सभागृहांत त्यांनीं जे जलसे सुरूं केले ते पुढें अव्याहत ७ वर्षें चालूं होते. सर्व जातींच्या मोठ्या सणांना जलसे ठेवून लोकांत संगिताची अभिरुचि उत्पन्न करण्यासाठीं त्यांनीं या जलशांचा उपयोग करण्यांत मोठीच मार्मिकता प्रकट केली.

जलसा सुरू होण्याची वेळ जर रात्रीची ९॥ ठेवली असेल तर जलसा ९॥ च्या ठोक्याला प्रारंभ करण्याबद्दल पंडितजींचा कटाक्ष असे. त्या वेळच्या खांसाहेबी वेळकाळाचें बंधन न पाळणाऱ्या बिनहिशेबी प्रकारास पूर्ण फांटा देऊन वेळेवर जलसा सुरूं करणें, त्याचप्रमाणें वेळेवर जलसा संपविणें ही प्रथा पंडितजींनीं सुरूं केली.

संशोधन वृत्तीचा मनुष्य हा जों जों अधिक विचार करूं लागतो, तों तों त्याला नवीन कल्पना सुचूं लागतात. इंग्रजी आर्केस्टा (Orchestra) ऐकून पंडितजींना भारतीय

वृन्दवादनाची कल्पना सुचली. तबला-तरंग, तंबोरा-तरंग इत्यादि नवीन प्रकार पंडितजींनीं काढले. 'फ्लॅगड्रिल' वगैरे निरनिराळ्या कवायती बरोबर त्यांनीं भारतीय संगिताची जोड देऊन व्यायामाला संगिताच्या जोडीनें रंग आणला. तबला-तरंग, तंबोरा-तरंग म्हणजे ११-१२ तबले व तंबोरे निरनिराळ्या स्वरांत मिळवून तीं वाद्यें वाजविण्यास तितकींच माणसें बसवून रागांतील वर्ज्यावर्ज्य संभाळून हे दोन्ही तरंग त्यांनीं वाजवून दाखविले.

जी कल्पना डोक्यांत आली ती कल्पना अमलांत आणून दाखविण्यांत पंडितजी नेहमींच तत्पर असत. पाश्चिमात्यांच्या 'हार्मनी' चा विचार करून भूप रागाची एक सारीगम पाश्चिमात्य हार्मनी पद्धतीनें वृन्दवादनावर त्यांनीं वाजवून दाखवली. या सगळ्या उपयोगासाठीं त्यांच्यापाशीं मनुष्यबळ भरपूर होतें. कारण ४०-५० विद्यार्थ्यांना खाण्यापिण्यास घालून त्यांनीं स्वत:जवळच ठेवलें होतें. त्यांच्याकडून निरनिराळीं वाद्यें वाजविण्याचीं हीं कामें ते करून दाखवीत.

त्यांना नुसता गाण्याचा ध्यास नव्हता; तर संगीत साकार कसें करावें यासाठीं त्यांची धडपड होती. प्रत्येक वाद्यांतून संगीत साकार करून दाखविण्याची आश्चर्यजनक शक्ति पंडितजींजवळ होती.

आतां त्यांनीं मुंबईचें गांधर्व महाविद्यालय हेंच मुख्य विद्यालय ठरवून लाहोरचें मूळ विद्यालय शाखेच्या रूपांत राखलें. पुढें पाकिस्तान होईपर्यंत तें अव्याहत सुरूच होतें. याशिवाय पुणें, नागपूर, कोल्हापूर या ठिकाणींहि शाखा

काढून त्यांनीं कार्य चालविलें होतेंच. उपशाखांनीं व पंडितजींच्या शिष्यांनीं भारतभर संगीतप्रसाराचें कार्य सुरू ठेवलें. पुढें त्यांच्या शेंकडों शाखा व उपशाखा पसरल्या. सर्व भारतच काय पण भारताबाहेर रंगूनपर्यंत सुद्धां पंडितजींच्या शिष्यांनीं संगीतप्रसाराचें कार्य केलें.

**संगीत परिषदा**

संगीत परिषद भरविण्याची नवीन पद्धति त्यांनीं सुरूं केली. मोठ्या जोमानें १९१८ सालीं त्यांनीं प्रथम संगीत परिषद भरविली. तें परिषदेचें कार्य मुंबईस पांच वर्षें करण्याचा संकल्प प्रारंभीं त्यांनीं केला होता, परंतु या परिषदेचें कार्य पुढें कायमचें होऊन राहिलें. या परिषदांच्या रूपानें संगिताचार्यांचाच मेळावा भरूं लागला. परिषदांचें अध्यक्षस्थान कै. बॅ. जयकर, कै. श्रीमंत इचलकरंजीकर, कै. गायनाचार्य बाळकृष्णबुवा, दे. भ. कै. नाट्याचार्य खाडिलकर इत्यादि विद्वान् गृहस्थांनीं भूषविलेलें होतें. अर्थातच त्यामुळें परिषदेच्या कार्याला भारदस्तपणा व विद्वन्मान्यता मिळाली. परिषदरूपी वृक्ष पुढें इतका फोंफावला कीं आज घटकेपर्यंत त्याचा प्रचार अव्याहत सुरू आहे. याचें सर्व श्रेय अर्थात् पंडितजींनाच द्यावें लागेल.

या संगीत परिषदामधून सर्व चर्चा इंग्रजींत चाले त्याचें पंडितजींना दुःख होई. गायक लोकांनाहि इंग्रजी भाषा समजत नाहीं म्हणून परिषदेचे सर्व व्यवहार हिंदी भाषेंतच चालावेत असा त्यांनीं आग्रह धरला आणि तो अंमलांतहि आणला. पंडितजींना संगीतकला ही मूठभर लोकांची मिरासदारी बनवायची नव्हती तर तिचें लोण

जनताजनार्दनापर्यंत पोहोंचवावयाचें होतें. या त्यांच्या दृष्टीमुळें सामान्य गायकालासुद्धां संगितांत आपण काय सुधारणा करणें अवश्य आहे याची जाणीव होऊं लागली. हिंदी भाषेमुळें अखिल भारतांत संगीत परिषदा भरूं लागल्या. त्या परिषदांतून पंडितजींनीं व्याख्यानें दिलीं. प्रत्यक्ष गाऊन दाखविलें. संगिताचें साकार स्वरूप जनता जनार्दनाच्या खालच्या थरापर्यंत माहीत करून दिलें. संगिताचें खरें रूप जनतेला पटवून देऊन परमेश्वरप्राप्तीचें सुख या संगीत विद्येंत आहे असें त्यांनीं आवर्जून लोकांपुढें मांडलें. कुणाची खुशामत करून विलासांत रंगून जाणें हें संगीत विद्येचें खरें लक्षण नव्हे हें जनतेला या परिषदांतून ते पटवीत असत.

पंडितजींनीं १९१८ ते १९३० पर्यंत भारतभर संगित परिषदा भरविल्या व सुशिक्षित जनतेमध्यें, संगीताबद्दल प्रेम व आदर उत्पन्न केला. भारतांतील प्रत्येक लहान मोठ्या शहरांत संगीत परिषदा भरवून त्यांनीं शास्त्रीय संगिताचा प्रचार केला. नवीन पिढीला योग्य तें ज्ञान देऊन संगीतकलेच्या प्रत्येक बाबतींत संशोधनाची किती आवश्यकता आहे हें पटवून देण्याचें कार्य परिषदांच्या रूपानें त्यांनीं केलें. संगिताचे जुने ग्रंथ आजच्या गाण्याला किती उपयोगी आहेत किंवा नाहींत याचा खल व्हावा, संगिताचें ध्वनिशास्त्र, सिद्धान्त, संगीत चिजांचें शुद्धीकरण करावें, भारताची संगीत लेखनपद्धति एक असावी, जुन्या ग्रंथांचीं भाषांतरें करावींत. याशिवाय वरील सर्व विषयांचे अभ्यासक संगीत विद्या शिकून

इंग्रजी विद्येचे पदवीधरहि तयार व्हावेत अशा अनेक गोष्टी या परिषदांतून प्रामुख्यानें ते मांडीत असत. त्याच बरोबर मराठी, गुजराथी, बंगाली इत्यादि प्रांतीय भाषांतून काव्य निर्माण करून त्या त्या भाषांतून संगीत गाइलें गेल्यास संगिताचा आणखी चांगला प्रचार होईल असा पंडितजींना विश्वास होता. अशा विचारानें भारतांतलें संगीत सर्व भाषांमधून समृद्ध झाल्यास अशिक्षित माणसापासून ते सुशिक्षित माणसापर्यंत संगिताचा प्रचार होऊन भारतीय संगीत सर्व बाजूंनीं समृद्ध होईल असें त्यांना वाटत असे आणि असें सर्व समृद्ध भारतीय संगीत हें इतर विद्यांच्या तोडीस बसविणें, हेंच त्यांचें ब्रीद होतें. इतर विषयांसाठीं विश्वविद्यालयांतून जसे पदवीधर विद्वान् म्हणून गाजतात तसें संगिताचें विश्वविद्यालय होऊन त्यांतून संगिताचे विद्वान् पदवीधर निघून संगिताचा उद्धार व्हावा याच हेतूनें त्यांनीं गांधर्व महाविद्यालय स्थापन केलें होतें.

**गांधर्व महाविद्यालयाची मुंबईस इमारत**

पंडितजींनीं मुंबईस १९०८ मध्यें महाविद्यालय स्थापन केल्यावर १९१२–१९१३ पर्यंत म्हणजे पांच वर्षांत विद्यार्थ्यांची संख्या ५००–६०० पर्यंत वाढली. मुंबईस ५००–६०० रुपये भाडें भरून देखील जागा अपुरी पडूं लागली. म्हणून त्यांनीं जलशांमधून धनिकांना व दानशूरांना प्रकटपणें विनंति करण्यास प्रारंभ केला. या विनंतीला यश येऊन १९१३ मध्यें कै. सर भालचंद्र कृष्ण भाटवडे-कर यांच्या हस्तें विद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला

समारंभ झाला. मुंबईच्या इंप्रुव्हमेंट ट्रस्टकडून एक प्लॉट सँडहर्स्ट रोडवर मिळवून या इमारतीच्या कामाला प्रारंभ झाला. इमारतीसाठीं आर्थिक मदत देण्याचें व प्रत्यक्ष इमारत उभी करून देण्याचें कार्य त्या वेळच्या आंग्र्यांच्या वाडीचे मालक श्रीमंत सरदार बाबासाहेब बिवलकर यांनींच केलें. लहानपणापासून पंडितजींना ओळखणारे व कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांचे जामात असल्यामुळें श्रीमंत सरदार बाबासाहेब बिवलकर यांचा व पंडितजींचा परिचय विशेषच वाढला होता. त्यामुळेंच इमारत पूर्ण होणें सुलभ झालें.

१९१५ सालीं विद्यालयाच्या इमारतीचें उद्घाटन त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्तें झालें. १९१८ सालीं विद्यालयांत विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचें उद्घाटन श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांच्या हस्तें झालें. विद्यालयाचें स्वतःचें 'श्रीरामभुवन' सभागृह ५०० ते ७०० श्रोते बसूं शकतील एवढें मोठें झाल्यामुळें पूर्वीच्या फ्रॉमजी कावसजी सभागृहाऐवजीं आतां विद्यालयाच्या सभागृहामध्येंच गाण्याचे जलसे सुरू झाले. अशा तऱ्हेनें खर्चाची बाब कमी होऊन विद्यालयाचें व जलशाचें कार्य स्वतःच्या इमारतींत सुरू झालें खरें पण त्याच वेळीं १९१४ चें पहिलें महायुद्ध भडकलें. त्यामुळें आर्थिक परिस्थिति पुन्हा बिकटच झाली. लढाईमुळें बाहेरगांवीं जलशांना उत्पन्न फारसें होईना. तेव्हां अखेर पंडितजींनीं रामायण प्रवचनांची कास धरली. पहिल्या चातुर्मासअखेर कांहीं धनिकांनीं या रामायण

प्रवचनांत देणग्या दिल्यामुळें आर्थिक परिस्थिति सुधारण्याची आशा पंडितजींना वाटत होती, पण पुढील तीन-चार वर्षांत पंडितजींची या बाबतींत पूर्ण निराशा झाली. १९२४ सालीं विद्यालयाची इमारत कर्जापायीं हातची गेली. त्यामुळें तर पंडितजी फारच निराश झाले, तरीपण त्यांनीं अगोदरपासूनच मोठी खटपट करून नाशिकला 'श्रीरामनाम आधार आश्रम' स्थापन केला होता. मग तेथेंच जाऊन पंडितजींनीं वास्तव्य केलें. पुढें 'श्रीरामनाम आधार आश्रम' ही सार्वजनिक संस्था करून अखेरपर्यंत ते त्या आश्रमामध्येंच वास्तव्य करून राहिले होते.

### अखेर रामायण-प्रवचनावरच भर

१९०२ सालापासून रामायण-प्रवचनांचें कार्य पंडितजींनीं सुरू केलें होतें. विद्यालयाची इमारत गेल्याचें मनाचें दुःख घालविण्यास श्रीरामायण प्रवचन हें एकच साधन त्यांच्यापाशीं होतें. त्याचाच पंडितजींनीं स्वीकार करून अखेरपर्यंत तेंच कार्य ते करीत राहिले. अर्थात् रामायणाबरोबर संगिताचा व्यासंग व विद्यार्थ्यांना संगीत शिक्षण देण्याचे त्याचें कार्यहि अविरत चालू होतें. इमारत गेल्यामुळें झालेल्या मानहानीचा उमाळा थोडा थंडावल्यानंतर त्यांनीं पुनश्च दौरे सुरूं केले. मनाला शांति मिळेल आणि स्वतःचा उद्धार श्रीरामानामामुळें होईल या उच्च विचारानें भारावूनच पंडितजींनीं या पुढील संगीत—प्रसाराचें कार्य चालविलें. रामायणामुळें संगिताचा प्रचार सुलभ होत गेल्यानेंहि अखेरपर्यंत तेंच कार्य करीत राहण्याचा पंडितजींनीं निर्धार केला.

## रामायणद्वारां संगिताचा प्रचार

पंडितजी ज्या काळांत लाहोरला रहात असत त्या काळांत सभ्य लोकांनीं गाणें ऐकण्याची प्रथा नव्हती. त्यामुळें समाजांतील सभ्य लोकांत गाण्याची आवड उत्पन्न करण्यास रामायणाची कथा हिंदींत सांगण्यास पंडितजींनीं प्रारंभ केला. हे सभ्य लोक रामायण ऐकतां ऐकतांच राम भजनें म्हणूं लागत. संगीत शिकणें हें वाईट नसून परमेश्वराची भक्ति करण्यास तें एक उपयुक्त साधन आहे असें पंडितजी त्यांना पटवूं लागले, रामायण ऐकण्यासाठीं येणाऱ्या सभ्य श्रोत्यांनाहि तसेंच वाटूं लागलें, आणि त्यांतूनच त्या मंडळींत संगिताच्या अभ्यासाची गोडी उत्पन्न झाली. ते संगीत शिकूं लागले. तरीपण लाहोर त्या मानानें मागासलेलें शहर आणि मुसलमानी संस्कार लोकांच्यावर फार. त्यामुळें तेथें संगीताच्या प्रचाराचा जोर म्हणावा तसा वाढूं शकला नाहीं. १९०१ पासून १९४७ पर्यंत लाहोरला गांधर्व विद्यालयाची शाखा होती, पण एकहि नामांकित विद्यार्थी तेथें तयार झाला नाहीं, म्हणूनच पंडितजींनीं मुंबईस आल्यावर संगीत शिक्षणाबरोबर संगिताचे जलसे व त्याचबरोबर रामायणावरील प्रवचनें याकडे विशेष लक्ष वळविलें; त्यामुळें प्रचारहि चांगला होऊं लागला. माधवबाग, ठाकुरद्वार इत्यादि ठिकाणीं संगीत रामायण कथा संगीत गायल्या जाऊं लागल्या. मारवाडी, गुजराथी, महाराष्ट्रीय. अशी सर्व मंडळी त्याकडे आकर्षित होऊं लागली. संगिताचा उपयोग फार मोठा आहे, परमेश्वरावरील विश्वास यामुळें वाढतो, संगीतामुळें

मानवाला मन:शांति मिळून मन प्रसन्न राहतें असा प्रचार करून त्यांनीं संगिताचें श्रेष्ठत्व मोठ्यापासून लहानापर्यंत सर्वांना पटवून दिलें. संगीताचें लोण रामायणाच्या द्वारां त्यांनीं सर्वत्र पोचविलें. महात्मा गांधी हे सुद्धां रामायणामुळेंच संगिताकडे वळले. त्यांच्या प्रार्थनेंत 'रघुपति राघव राजाराम पतित पावन सीताराम' या धुनचा समावेश पंडितजींच्यामुळेंच केला गेला.

## ईश्वराची सेवा आणि प्रसार

रामनामांत पंडितजीं अखेरी अखेरीस इतके रंगून गेले होते कीं, "आतां रामनामाशिवाय मुखानें दुसरें गाणें आवडेनासें झालें आहे." असें ते सांगत. कोणी "जुन्या चिजा ऐकवा" असें मुद्दाम सांगितलें तरच ते गात. अशा रीतीनें रामायणवाचनानें परमेश्वराच्या भजनांत रमल्यामुळें पंडितजींनीं आपल्या देहाचें सार्थक केलें. पुण्यास १९१५ व १९२८ सालीं तुळशीबागेंत व भिकारदास मारुतीच्या मंदिरांत त्यांनीं रामायणावर प्रवचनें केलीं. तशींच त्यांनीं सर्व भारतभर रामायणावर प्रवचनें केलीं. जेथें जलशाला गर्दी होत नसे तेथें रामायणप्रवचन करून मग आपल्या गाण्याचा जलसा करीत. मूळ रामायण प्रवचन करीत तें मात्र आपल्या महाविद्यालयाच्या प्रचारार्थ करीत असत.

या रामायणप्रवचनानें स्व. पं. मदनमोहन मालवीय व स्व. महात्मा गांधींच्या सारखीं जगद्वंद्य माणसें पंडितजींच्या रामायणावर मोहित असत. अशा रीतीनें भक्तीची ज्योत पंडितजींनीं तेवत ठेवली होती. संगिताच्या

साहाय्यानें रामनामाचा जप श्रोत्यांच्याकडून करवून घेऊन त्यांचें जीवन सार्थकी लावण्याचें कार्य केलें. यापुढें पंडित-जींनीं रामनामाचा कोटि कोटि जपहि करवून घेतला. रामनामाचा संगीत संदेश घरोघर पोहोंचवून व्यक्तीचा व देशाचा उद्धार करण्यास पंडितजींनीं हातभार लावला. त्याचा सुपरिणाम निश्चित घडला. पंडितजींना लोक पुढें 'रामभक्त' म्हणूनच संबोधूं लागले.

संगिताला जोडणाऱ्या ज्या ज्या गोष्टी होत्या त्या त्या पुढें पंडितजींनीं आत्मसात् केल्या. पंडितजींचें घराणें मूळ कीर्तनकारांचें त्यामुळें रामायणप्रवचनाच्या नंतर कीर्तनकार होण्याची त्यांना इच्छा झाली. १९१५ सालीं मिरजेस मुक्काम असतांना कीर्तनाची दीक्षा पंडितजींचे पहिले आश्रय-दाते श्रीमंत स्व. बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानाधिपति यांनींच त्यांना दिली. पूर्वरंग व आख्यान पाठ करून श्रीमंतांच्या पुढें पहिलें कीर्तन झालें. पुढें श्री नरसिंहवाडी येथें श्रीदत्तासमोर रामायणावरील कीर्तनाचा सप्ताह केला. व गाण्याचीहि सेवा निरनिराळ्या वेळेला केली. कीर्तन रामायणाला जवळपासच्या खेड्यांतून लोक येऊन गर्दी करूं लागले, रामायण-कीर्तनाची समाप्ति झाल्यावर देवदर्शनाला गेले असतां पुजाऱ्यांनीं पंडितजींना श्रीदत्तमहाराजांनीं आपल्या अंगावरची छाटी देण्याबद्दल दृष्टान्त झाल्याचें सांगितलें.

कोणालाच कधीं न मिळणारी श्रीदत्त महाराजांची छाटी पुजाऱ्यांनीं हातीं दिल्यावर पंडितजींना गहिंवरून आलें. आपल्या पूर्वजांच्यावर श्रीदत्ताची कृपा होती, तशीच

आपल्यावरहि झाल्याचें पाहून पंडितजींच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. पुढें ही छाटी रामायण प्रवचन व कीर्तनाच्या वेळीं परिधान करूनच पंडितजी कार्यक्रम करीत असत. परमेश्वराच्या प्राप्तीकरितां किंवा संगीताच्या सिद्धीकरितां सर्वस्वाचा त्याग करून अशी 'भगवी छाटी' अंगिकारावी लागते असें ते विनोदानें म्हणत असत. या छाटीमुळेंच पुढील काळांत इतर कपड्यांचा त्याग करून केवळ कफनी घालणेंच त्यांना आवडूं लागलें.

**पंडितजींचा संसार**

पंडितजींचा संसार १९०७ पासून प्रत्यक्ष पाहण्याचें भाग्य प्रस्तुत लेखकास लाभलें आहे. पंडितजींच्या मातुःश्री १९१३ सालीं स्वर्गवासी झाल्या. पंडितजींचें एक वडील बंधु स्व. गोपाळबुवा म्हणून होते त्यांच्याहि प्रपंच्याचा भार पंडितजींवरच होता. पंडितजींना आठ कन्या व चार पुत्र रत्नें झालीं. त्यांच्या सहचारिणी स्व. सौ. रमाबाई यांची आपल्या संसाराबरोबरच विद्यार्थ्यांच्यावरहि कृपादृष्टि असे. पंडितजींच्या आठ कन्या व तीन मुलगे त्यांच्या समक्षच स्वर्गवासी झाले. आठ कन्यांपैकी दोन मुली जर जगल्या असत्या तर सभ्य स्त्रियांमधून संगिताचा प्रसार करण्यासाठीं त्यांना उत्तम संगीत शिकवून त्यांच्याकडून संगिताच्या प्रचाराचें कार्य करविलें असतें, असें पंडितजी नेहमीं म्हणत.

पंडितजींचे एकच चिरंजीव दत्तात्रय विष्णु अर्थात् बापुराव पलुसकर हे पंडितजींच्या पश्चात् २४ वर्षें जगले. डी. व्ही. पलुसकर या नांवानें ते संगिताच्या

सृष्टींत चमकून गेले; व पंडितजींचा नांवलौकिक वाढविण्यास कारणीभूत झाले. या डी. व्हीं. चे संगिताचें शिक्षण प्रस्तुत लेखकांजवळ सतत ८-९ वर्षें झालें. तेंहि पंडितजींच्या आज्ञेवरूनच झालें. पंडितजींचें विद्यालय व पंडितजींचें कार्य पुढें चालविण्याच्या सदिच्छेंत असतांनाच डी. व्ही. अर्थात् बापूराव पलुसकर हे १९५५ सालीं दसऱ्याच्या दिवशीं स्वर्गवासी झाले. पंडितजींच्या सहचारिणी तो. रमाबाई अर्थात् आईसाहेब याहि १९५७ सालीं स्वर्गवासी झाल्या. त्यांच्या पश्चात् स्व. बापूरावांचें कुटुंब व मुलगा चि. वसंत व मुलगी चि.पद्मा या तोन मंडळींचा संसार सांप्रत सुरू आहे. एकंदरींत पंडितजींचा संसार एका बाजूनें दुःखो होता, पण विद्यार्थी ठेवून घेऊन त्यांना संगिताचें शिक्षण देण्याचा संसार फारच मोठा आनन्ददायी झाला. आज सर्व भारतांत मोठमोठ्या शहरीं पंडितजींचें शिष्य संगिताच्या प्रसाराचें कार्य मोठ्या जोमानें करीत आहेत.

### पंडितजींचा राष्ट्रीय बाणा

पंडितजींचा स्वदेशाभिमान फार जाज्वल्य होता. पंडितजी नेहमीं म्हणत, "ज्या कलेवर किंवा विद्येवर आपण पोट भरतों, त्या विद्येचा सर्वत्र फैलाव करून त्या विद्येची किंवा कलेची उन्नति करणें हा सुद्धां एकप्रकारें स्वदेशाभिमानच होय." सन १९०६–१९०७ सालीं स्वदेशी कपड्यांची लाट उसळली होती. त्या वेळी पंडितजी व त्यांचे शिष्य स्वदेशी कपड्यांचीं ठाणें खांद्यावर टाकून लाहोर येथें बाजारांत विक्रीस जात असत.

१९०६ सालापासून १९३० सालापर्यंत राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनामध्यें प्रत्येक वर्षी 'वंदेमातरम' व 'भारत हमारा देश है' हीं पदें पंडितजी म्हणत असत. १९११ सालीं पंचम जॉर्ज बादशहा म्हणून भारतांत आले होते. "माझा राजा लो. टिळक मंडालेच्या किल्ल्यांत कैदेंत आहे तोपर्यंत या राजाचें तोंड पहाणार नाहीं" असें स्वाभिमानानें पंडितजी त्या वेळीं खाजगीपणें आपल्या विद्यार्थ्यांसमोर बोलले होते. राजकीय सर्व पुढाऱ्यांशीं पंडितजींचा उत्तम परिचय होता. १९२३ च्या कोकोनाडा काँग्रेसचे, अध्यक्ष मौ. महमदअली यांनीं पंडितजींना 'वंदेमातरम' गीत गाण्यास मनाई करतांच त्यांचा राष्ट्रीय अभिमान जागा होऊन त्यांनीं तडकवून त्यांना विचारलें होतें, "ही काँग्रेस म्हणजे तुम्ही काय मस्जिद समजतां काय ? ही सर्व जातींची काँग्रेस आहे. मी येथें 'वंदेमातरम्' म्हणणारच." हे स्वाभिमानपूर्ण उत्तर ऐकून महात्मा गांधी आदि सर्व पुढारी स्तंभित झाले. अखेर पंडिजींनीं तेथें संपूर्ण 'वंदेमातरम्' म्हटलें, पंडितजी लो. टिळकांचे परमभक्त होते. महात्मा गांधी पंडितजींचे भक्त होते कारण पंडितजी स्वदेशाचें संपूर्णपणें अभिमानी होते.

### पंडितजी व इतर गायक

पंडितजी स्वतः जरी गायक होते तरी इतर गवयांचें स्वागत पंडितजी नेहमीं मनमोकळेपणानें करीत. कै. गा. भास्करबुवांना संगीत परिषदेंत गाण्यास बोलावून आणलें होतें. परिषदेबरोबरच भारतीय वाद्यांचें प्रदर्शन पंडितजी भरवीत असत. त्याचें उद्घाटन कै. गा. पं. भास्करबुवा

बखले यांच्या हस्तें त्यांनीं करविलें होतें. पंडितजींचे गुरुदेव पं. गा. स्व. बाळकृष्णबुवा यांना त्यांनीं एका संगीत परिषदेचे अध्यक्ष केलें होतें. कै. नटवर्य नानासाहेब जोगळेकर हे तर त्यांचे बालमित्र होते. कै. नटवर्य केशवराव भोसले यांचेंहि पंडितजींवर प्रेम होतें. महाविद्यालयाच्या मदतीसाठीं 'सौभद्र' नाटक त्यांनीं दिलें होतें, पंडितजीपासूनच कै. केशवराव भोसले यांनीं नाटकें अगदीं वेळेवर सुरूं करण्याची दीक्षा घेतली होती. कुणीहि गायक पंडितजींच्याकडे आले असतां जलसे करण्यासाठीं विद्यालयाचें सभागृह ते विनामूल्य वापरण्यास देत असत. कुणाची राहण्याची सोय विद्यालयांत करीत. संगिताचा जो जो अभ्यासक असेल मग तो हिंदु किंवा मुसलमान कोणीहि असो, त्याला पंडितजी विद्यालयांत आश्रय देत असत. साऱ्यांना संगिताचें ज्ञान द्यावें व संगीत प्रत्यक्ष साकार करण्यास जो जो गायक मदत करील त्याला आश्रय देत असावें, असा पंडितजीचा अखेरपर्यंत रिवाज होता.

### पंडितजींचे शिष्य

पंडितजी इतर गायकांच्या गुणांबद्दल प्रेम ठेवीत; पण विद्यार्थ्यांच्यावर त्यांची करडी नजर होती. तसेंच संगिताच्या प्रसाराचें कार्य करण्यास वक्ते तसेच लेखक तयार होऊन संगिताचें कार्य नेटानें पुढें चालविण्यास त्यांनीं तत्पर असावें असा त्यांचा कटाक्ष असे. कै. पं. ना. मो. खरे, पं. ओम्कारनाथ व पं. ग. रा. गोखले यांनीं भारतीय संगिताच्या जुन्या ग्रंथांचे अभ्यास करून संगिताच्या प्रचारास हातभार लावला. कै. शंकरराव व्यास यांनीं

व प्रस्तुत लेखकानेंहि १०-१० पुस्तकें लिहून साडेअकराशें पद्यांचा संग्रह आज छापून प्रसिद्ध केला आहे. आणि याला सर्वस्वी कारण पंडितजीच होत. त्याचप्रमाणें गायक म्हणून भारतभर प्रसिद्ध असलेले कै. पं. वामनराव पाध्ये. पं. नारायणराव व्यास, पं. ओम्कारनाथ ठाकूर व पं. विनायकराव पटवर्धन हे प्रसिद्ध गायक झाले. याशिवाय शिक्षक तर शेंकड्यांनीं झाले आहेत.

पंडितजींच्या पश्चात् त्यांचें कार्य चालविण्यासाठीं गांधर्व महाविद्यालय मंडळ ही संस्था सर्व शिष्यांनीं मिळून काढली. आज त्याला सार्वजनिक अखिल भारतीय असें स्वरूप देण्याचें कार्य पंडितजींचे पुढील शिष्यच करीत आहेत.

थोड्याच दिवसांत पंडितजींच्या नांवें संगिताचें विश्वविद्यालय किंवा विद्यापीठ उघडण्याची तयारी पंडितजींचे शिष्य व पंडितजींचे प्रेमी सज्जन लोक करीत आहेत.

पंडितजींचें अखेरपर्यंत देशभर भ्रमण सुरूंच होतें. याच भ्रमणांत पंडितजी दोनदां नेपाळला जाऊन आले. अखेरपर्यंत त्यांच्याबद्दल लोकांमध्यें फार आदरच उत्पन्न होत गेला होता. अखेरच्या दौऱ्याच्या वेळीं ते वारंवार आजारी पडूं लागले; पण रामनाम घेऊनच ते आपला ताप नाहींसा करीत असत. अखेरच्या घटकेपर्यंत विद्यापीठांतून संगिताचा शिरकाव व्हावा अशी त्यांची खटपट चालूंच होती. त्यांना या दृष्टीनें कांहीं बाबतींत यश आलें.

कांहीं विद्यापीठांतून संगीत हा अभ्यासाचा विषय म्हणूनहि ठेवला गेल्यानें पंडितजींना बरें वाटत असे पण

आपण काढलेलें गांधर्व महाविद्यालय बंद होणार कीं काय अशी निराशा त्यांचे मनांत आली होती. प्रस्तुत लेखकाकडूनच तसें वचन घेऊन "माझे पश्चात गांधर्व महाविद्यालय सुरू ठेव" अशी आज्ञा त्याला दिली व त्याप्रमाणें पुण्यास गांधर्व महाविद्यालय ८ मे १९३२ ला सुरू केलें. त्यानंतर २०-२२ ठिकाणीं आज महाविद्यालयाचें कार्य मोठ्या प्रमाणांत सुरू आहे.

पंडितजींच्या मनाला लागलेला हृद्रोग कमी व्हावा म्हणून कोणीं सांत्वनपर बोलल्यास पंडितजी उत्तर देत, "माझें एक विद्यालय गेलें हें खरें, पण माझीं शेंकडों विद्यार्थीरूपीं जिवंत विद्यालयें आहेत ना ? हेच माझे विद्यार्थी-शेंकडों विद्यालयें काढून माझी इच्छा पूर्ण करतील." असा दृढ विश्वास पंडितजींच्या मनांत होता. या त्यांच्या अखेरच्या ज्या इच्छा होत्या त्या आज मूर्त स्वरूपांत आल्या असून त्यांचें महान् कार्य व त्यांची परंपरा त्यांची शिष्यशाखा चालवीत आहे.

**पंडितजींचा स्वर्गवास**

पंडितजी दुसऱ्यांदा नेपाळहून परत आल्यावर त्यांची प्रकृति पुन्हा बिघडली, व उपचार कांहीं न करण्याचा पंडितजींचा आग्रह असल्यानें अखेर प्रकृति फारच विकोपाला गेली. नाशिकला जाऊन राहण्याचें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें पंडितजी नाशिकला आलेहि. पंडितजींचे शिष्यलोक नाशिकला भेटून जाऊं लागले. पंडितजींच्या मनांतून परमेश्वराची—श्रीरामाची—सेवा करावी असें होतें. पण आर्थिक परिस्थिति बिघडल्यामुळें तें जमत नव्हतें. पंडितजीं-

च्या आजाराची बातमी कै. श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरजकर यांना कळतांच श्रीमंतांनीं पंडितजींना मिरजेस आणविलें. तेथें श्रीमंतांच्या खास देखरेखीखालीं पंडितजींची व्यवस्था केलेली होती. ५–६ महिन्यांत आराम वाटेल असें वाटत होतें. अशाहि परिस्थितींत रामायणपठण, विद्यार्थ्यांना शिकविणें हें त्यांचें काम सुरूच होतें.

पण काळ आलेला कुणालाच कळला नाहीं. शुक्रवार दि. २१ ऑगस्ट १९३१ ला ११ वाजेपर्यंत सकाळचा नित्यक्रम सुरू होता. पण पुढें ११ नंतर काळ फिरला व दुपारी ११। वाजतां पंडितजींची प्राणज्योति विझून पंडितजी स्वर्गवासी झाले.

'गाणें शिकण्यासाठीं माझ्या जवळच आला व जातांनाहि माझ्याजवळच गेला' असे श्रीमंत मिरजकरांनीं दुःखोद्गार काढले. अखेर पंडितजींचा देह, तो संगिताची साकार मूर्ति, परमेश्वररूपांत विलीन झाली.

卐 卐 卐

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
क्र. ९२२८ दि. २०।५।७
विषय बो. वा.
BVBK-0401229

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा व्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई भी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : बंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमी
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.